# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २०.१२.२०२४**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (१४.११.२०२४ ते २०.१२.२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२१.१२.२०२४ ते २५.१२.२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | दिनांक | २१ | २२ | २३ | २४ | २५ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३२ | ३२ | ३१ | ३० | ३० |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | १२ | १३ | १४ | १५ | १५ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ३ | १ | ३ | १ | २ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८४ | ८५ | ८४ | ८५ | ८५ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५० | ५१ | ५२ | ५१ | ५२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ४ | ३ | ४ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | ऊ.ई | ऊ.ई | ई | पू.ई | ऊ. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक २१ ते २५ डिसेंबर दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये २५ डिसेंबर पर्यंत कमाल तापमान ३०.० ते ३२.० अंश सेल्सिअस दरम्यान तसेच किमान तापमान १२.० ते १५.० अंश सेल्सिअस दरम्यान शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८४ ते ८५% तर दुपारची सापेक्ष आद्रता ५० ते ५२% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०३ ते ०४ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक **२५ ते ३१ डिसेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त** तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | **थंडीचे प्रमाण वाढल्यामुळे नागरीकांनी पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी**<br>➢ वृद्ध लोक आणि लहान मुलांची काळजी घ्यावी<br>➢ जास्तीती जास्त वेळ घरात राहावेप्रवास शक्यतो टाळावा .<br>➢ स्वेटर, मफलर, कानटोपी, पायमोजे हात मोजे घालावेत<br>➢ गरम पेय नियमितपने प्यावे<br>➢ हवामानाच्या अद्यावत महितीसाठी रेडियो ऐकावा, टिव्ही पाहावा तसेच वर्तमान पत्र वाचावे<br>**थंडीचे प्रमाण वाढल्यामुळे पिकांची पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी**<br>➢ थंडीपासून पिकाच्या बचावासाठी पिकास सायंकाळी हलके पाणी द्यावे<br>➢ केळीचे गुच्छ सच्छिद्र पॉलिथीन पिशव्याने झाकून ठेवा .<br>➢ उस तोड कामगार यांनी विशेष काळजी घ्यावी. थंडीच्या इशाऱ्या दरम्यान पहाटेच्या वेळी काम करणे शक्यतो टाळावे |
| संदेश | | ➢ डिसेंबर महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ३.६३ मिमी प्रती दिवस एवढा असतो ऊस पिकास दररोज २.१७ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ३३ मिनिटे चालवावा. |
| गहू | कांडी धरणे | ➢ गहू पिकावर पेरणीनंतर ५५ दिवसांनी १९:१९:१९ या विद्राव्य खताची २ % (२०० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी) या प्रमाणात फवारणी करावी. |
| हरभरा | वाढीची | ➢ घाटे आळीच्या नियंत्रणासाठी पिकास फुलकळी येऊ लागताच ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी.<br>➢ हरभरा पिक फुलोरा व घाटे भरण्याच्या अवस्थेत असताना २ % युरिया ची फवारणी करावी |
| स्ट्रॉबेरी | वाढीची | ➢ लागवडीनंतर साधारणत: ८५ ते ९० दिवसांनी स्ट्रॉबेरी फळांची जातींच्या पक्वतेनुसार काढणी १ दिवसाआड करावी. साठवणुकीसाठी प्रिकुलिंग व कोल्डस्टोरेज तंत्रज्ञानाचा वापर करावा. प्रिकुलिंग मध्ये स्ट्रॉबेरी फळे ० ते ४ अंश सेल्सिअस तापमानात ४ तास थंड केली जातात त्यामुळे फळांचे आयुष्यमान दुप्पटीने वाढते.<br>➢ स्ट्रॉबेरी फळझाडांना जमिनीच्या मगदुरानुसार २ ते ३ दिवसाआड ठिबक सिंचनाद्वारे पाणी द्यावे. |
| ऊस | सुरु ऊस लागवड | ➢ सुरु ऊस लागवड करण्यासाठी को.८६०३२(नीरा), फुले २६५, फुले १०००१, फुले ११०८२, फुले ऊस १५०१२, फुले १३००७, को.९४०१२(फुले सावित्री), को. ९२००५ यापैकी एका वाणाची निवड करावी.<br>**बेणे प्रक्रिया:**<br>➢ लागणीपूर्वी बेणे १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १०-१५ मिनिटे बुडवावे व नंतर अॅसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू अनुक्रमे १ किलो व १२५ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून त्यात कांडया ३० मिनीटे बुडवून लगेच लागण करावी. |
| डाळिंब | फुलधारणा आणि फळधारणा | मागील आठवड्यामध्ये अंशत: ढगाळ व कोरड्या हवामानामुळे डाळिंब फळ पिकावर रस शोषक किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना कराव्यात.<br>१. शोष किडींसाठी झाडाच्या शेंड्याच्या १५ सेंमी खाली नागमोडी (झिक-झ्याक) पद्धतीने पिवळे / निळे चिकट २५ ते ३० सापळे प्रती |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | अवस्था | एकर प्रमाणे बांधावेत. किडींच्या प्रादुर्भावानुसार खाली नमूद केलेल्या फवारण्या घ्याव्यात.<br>२. पहिली फवारणी: स्पीनेटोरम १२% एस. सी. @ १.०. मिली प्रती लिटर किंवा स्पीनोसॅड ४५% एस. सी. @ ०.५ मिली प्रती लिटर + ०.२५ मिली प्रती लिटर स्प्रेडर स्टिकर मिसळून फवारणी करावी.<br>३. दुसरी फवारणी: पहिल्या फवारणीच्या ७ ते १० दिवसांनंतर स्पीनोसॅड ४५% एस. सी. @ ०.५ मिली प्रती लिटर किंवा नीम तेल १% (१०००० पीपीएम) @ ३ मिली प्रती लिटर किंवा पोंगामिया (करंज बियांचे) तेल @ ३ मिली प्रती लिटर किंवा नीम तेल + पोंगामिया (करंज बियांचे) तेल प्रत्येकी ३ मिली प्रती लिटर + ०.२५ मिली प्रती लिटर स्प्रेडर स्टिकर मिसळून याप्रमाणे फवारणी करावी.<br>४. तिसरी फवारणी: गरज वाटल्यास, स्पीनोटेरम १२% एस. सी. @ १.० मिली प्रती लिटर किवा स्पीनोसॅड ४५% एस सी@ ०.५ मिली प्रती लिटर + ०.२५ मिली प्रती लिटर स्प्रेडर स्टिकर याप्रमाणे फवारणी करावी. |
| आंबा | मोहोर | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्यामुळे आंब्यावर तुडतुडे कीड आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ एस.एल.३ मिली + सल्फर ८० डब्ल्यूपी २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| टोमॅटो | फळ धारणा | ➢ कमाल तापमान २५ ते ३२ अंश सेल्सियस दरम्यान राहण्याची असल्याने टोमॅटो पिकावर फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी पिकावर नोवाल्युरोन १०% ई.सी. किंवा क्लोरॅनट्रनीलीप्रोल १८.५ एस.सी. ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| पशुधन | वाढीची | ➢ गायी-म्हशींच्या आहारात ज्वारी, गहू, मका यांसारख्या भरड धान्यांपासून तयार केलेला उच्च उर्जायुक्त आहार वापरा.<br>➢ किमान तापमानामध्ये घट होण्याची शक्यता असल्याने जनावरांचे गोठे उबदार ठेवणे गरजेचे आहे. विशेषतः वासरे, करडे व कोकरे यांच्या गोठ्यात रात्रीच्या वेळी तापमान उबदार ठेवावे व तापमान नियंत्रणासाठी गोठ्याच्या सर्व बाजूना पडदे लावावेत किंवा बारदाण्याच्या सहाय्याने काळजीपूर्वक बंद कराव्यात. |
| कुक्कुटपालन | वाढीची | ➢ पुढील ५ दिवस किमान तापमान १६.० अंश सेल्सिअस पर्यंत कमी होण्याची शक्यता असल्याने पोल्ट्री पक्ष्यांचे थंडीपासून बचावासाठी पोल्ट्री शेड मधील तापमान रात्रीच्या तसेच पहाटेच्या वेळी उबदार राहील याची काळजी घायवी. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर

दि. : २०.१२.२०२४

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**

**सहयोगी संशोधन संचालक,**

**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**